lewu – 24/11/88

# पीठ गिरणी व लघुउद्योजक संघटना, पुणे जिल्हा

कार्यालय : मु. पो. पाईट, ता. खेड, जि. पुणे

नोंदणी क्रमांक :

जावक क्र. दिनांक 26/11/88

मा. मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य

विषय – खेड तालुक्यातील पीठ गिरणी व्यावसायिकांच्या प्रश्नाबाबत

महोदय,

खेड तालुक्यातील पीठ गिरणी व्यावसायिकांना जानेवारी ८८ च्या सुमारास भात भरडण्याचे हलर्स बंद करण्याविषयी नोटिसा आलेल्या आहेत. आम्ही याबाबतीत जिल्हाधिकारी, पुणे आणि शासनाचे पुरवठा मंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे पत्र व्यवहार केला आहे. आमच्या दि. १२ जाने. ८८ च्या पत्राला जिल्हाधिकारी पुणे यांचेकडून दि. ५ फेब्रु. ८८ रोजी आलेल्या पत्र क्र. पीएस/राच/१५/२५/८८ मध्ये आधुनिक पध्दतीच्या हलर्सनाच फक्त परवाना देण्याचे शासनाचे धोरण आहे, असा खुलासा केला आहे. शासनाचे हे धोरण पीठ गिरणी व्यावसायिकांवर अन्याय करणारे आहे. असे आमचे स्पष्ट मत झाले आहे. यासंबंधात आमची भूमिका सविस्तर निवेदन करत आहोत.

खेड तालुक्यात सुमारे ३००-३५० पीठ गिरण्या आहेत. यापैकी बहुतेकांकडे भात भरडण्याचे हलर्स आहेत. या पूरक उद्योगामुळेच पीठ गिरणी व्यावसायिक आजवर तग धरून आहेत. ठराविक लोकसंख्येच्या प्रमाणातच पीठ गिरणी सक्षम व किफायतशीर राहू शकते. परंतु शासनाकडून अनियंत्रित परवाने दिले गेल्यामुळे गिरण्यांची संख्या प्रमाणाबाहेर वाढून त्यांच्या अनिष्ट स्पर्धा सुरू झाली. यातच शासनाच्या हलर काढून त्याजागी आधुनिक शेलर बसवण्याची सक्ती करणारा आदेशाने हे सर्व व्यावसायिक अधिक अडचणीत आले आहेत.

हलरमध्ये लहान प्रमाणात भात भरडला जातो. या भागात बहुसंख्य लहान व मध्यम शेतकरी असल्याने त्यांच्या गरजे-साठी हलर उपयुक्त आहेत. शेलर बसविण्यासाठी लागणारी वाढीव गुंतवणूक करण्यास आवश्यक भांडवल त्यांच्यापाशी नाही. आणि गुंतवणूक करायची म्हटली तरी तेवढ्या प्रमाणात भाताचे उत्पादन नसल्याने शेलरमुळे सर्वच व्यवसाय तोट्यात जाणार हे उघड आहे. आणि त्यांचे व्यवसाय बंद पडणार.

भाताचे उत्पादन आर्थिक मिळावे या हेतूने जरी शासनाने हे धोरण अवलंबिले असले तरी येथील परिस्थितीत ते

# पीठ गिरणी व लघुउद्योजक संघटना, पुणे जिल्हा

**कार्यालय :** मु. पो. पाईट, ता. खेड, जि. पुणे

**नोंदणी क्रमांक :**

---

जावक क्र. दिनांक

व्यवहार्य ठरणार नाही. कारण सोलर आधीक भालाची गरज असते. याकडे आम्ही लक्ष वेधू इच्छितो.

वरील परिस्थितीचा विचार करून शासनाने आपल्या धोरणाचा पुनर्विचार करावा.

सोलर संबंधातील निर्बंध केंद्र सरकारच्या धोरणानुसार घातले असल्याचे पुरवठा खात्याचे सचिव श्री. पाटील यांच्या सांगण्यावरून समजले. तरी आपण मुख्यमंत्री यानात्याने आमची भूमिका समजून घेऊन केंद्र सरकारपर्यंत पोचवावी. व आम्हास न्याय मिळवून द्यावा. व तोपर्यंत याप्रकरणी काही निकाल लागत नाही तोपर्यंत या व्यावसायिकांवर कोणतीही कारवाई होऊ नये.

गेल्या अनेक वर्षापासून अनेकाकडे हलर्स चालू आहेत. परवाने पध्दतील किचकट तांत्रिक व इतर अडचणीमुळे त्यांनी परवाने घेतलेले नाहीत. तसेच शासनाने देखील ते देण्याचे स्थगीत केले आहे. आमची इच्छा असूनही आम्हाला ते मिळू शकले नाही.

आजच्या ग्रामीण बेकारीच्या पार्श्वभूमीवर या लोकांनी आपल्या उपजीविकेचे साधन उभे केले आहे. त्यांना परवाने देऊन त्यांचे व्यवसाय नियमित करून घ्यावे.

पीठ गिरणी व्यावसायिक हे लघु उद्योजक आहेत. त्यांचे दळणाचे व भात भरडण्याचे आजचे दर शहराच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजे आहेत. पुण्यात किलोला ५० पैसे दर आहे. तर आमच्या भागात केवळ १५ पैसे दर आहे. मात्र आम्हाला वीज मात्र शहराच्या दरानेच मिळते. त्यामुळे धंदा किफायतशीर होत नाही. धंद्याची व्याप्तीही मर्यादित आहे. लघुउद्योजकांना उत्तेजन व सवलती देण्याचे शासनाचे धोरण असल्याचे म्हटले जाते. तरी आम्हाला वीज दरात सवलत मिळावी.

<u>आमच्या मागण्या</u>– १) हलरच्या भागी सोलर बसविण्याची सक्ती करणारा आपला आदेश शासनाने मागे घ्यावा.

२) हलर परवाने देऊन त्यांचे व्यवसाय नियमित करण्यात यावेत.

३) पीठ गिरणी व भात हलर्सचे परवाने लोकसंख्येच्या प्रमाणात द्यावे.

४) पीठ गिरणी व्यावसायिकांना वीज दरात सवलत मिळावी.

– 3 मागे पहा.

या मागण्यांचा सहानुभूतीने विचार करून योग्य कारवाई करावी ही विनंती

आपले विश्वासू

अजित सरदार - अध्यक्ष अजितसरदार

शांताराम गोपाळे - सरचिटणीस शांताराम गोपाळे